शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद, नांदेड
रेल्वे स्टेशन रोड,जिल्हा व सत्र न्यायालया समोर वजिराबाद, नांदेड
वेबसाईट -:www.zpnanded.in ई -: मेल-ssananded1@gmail.com

410

जाक्रं./जिपनां/शिअप्रा/प्रा-१ अ / /२०२२ दिनांक:

17 JAN 2023

प्रति,
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती,सर्व,
जिल्हा नांदेड.

विषय –नांदेड जिल्हा परीषद ,शिक्षण विभाग प्रा अंतर्गत संवर्गीय कर्मचारी यांची दिनांक-०१.०१.२०२३ रोजीची प्राथमिक सेवाजेष्ठता यादी अद्ययावत करणेबाबत देण्यात येणा-या आवश्यक सूचना.

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की,नांदेड जिल्हा परीषद शिक्षण विभाग प्रा अंतर्गत (१) **प्राथमिक शिक्षक (माध्यम-मराठी)** (२) **प्राथमिक शिक्षक-उर्दू-** (३) **पदवीधर शिक्षक-भाषा-**(४) **पदवीधर शिक्षक-सामाजीक शास्त्र-** (५) **पदवीधर शिक्षक- गणित/विज्ञान** (६) **उच्च श्रेणी मुख्याध्यापक** (७) **केंद्रप्रमुख,** (८ ) **माध्यमिक शिक्षक** (९) **अराजपत्रित मुख्याध्यापक** (१०) **माध्यमिक शिक्षक -माध्यम-मराठी** (११) **माध्यमिक शिक्षक –माध्यम उर्दू-** (१२) **शारीरीक शिक्षक** (१३) **चित्रकला शिक्षक** (१४) **प्रयोगशाळा सहायक** (१५) **विस्तार अधिकारी शिक्षण** (१६) **दिव्यांग गटातील स्वतंत्र सेवाजेष्ठता यादी** इ. संवर्गाची प्राथमिक स्वरूपातील संदर्भ दिनांक ०१.०१.२०२३ हा लक्षात घेवून सेवा जेष्ठता यादी –प्राथमिक प्रसिध्द करून आवश्यक दुरूस्तीसाठी आपल्याकडे देण्यात येत आहे. त्याकरिता खालील सूचनेप्रमाणे जेष्ठता सूचीची माहिती अद्ययावत अंतीम करण्यात यावी.

- सेवाजेष्ठता यादी तयार करीत असताना ३१.१२.२०२२ रोजी पर्यंत सेवानिवृत, मयत, पदोन्नती, आंजिब इतर जिल्हयात बदली झालेल्या, राजीनामा दिलेल्या, स्वेच्छा निवृती घेतलेल्या कर्मचा-यांचा समावेश करण्यात आला आहे का ? याची खातर जमा करण्यात यावी. गत वर्षीच्या जेष्ठता सूचीतून या वर्षी कमी केलेल्या शिक्षकांची व नविन समाविष्ट केलेल्या शिक्षकांची स्वतंत्र यादी तयार करून सादर करावीत.
- सेवाजेष्ठता यादी चा प्रामुख्याने वापर हा पदोन्नती करण्यासाठी करण्यात येतो. विभागाच्या सेवाजेष्ठता याद्या हया सदोष असल्याबाबत पदोन्नती समितीच्या बैठकीत सदस्यानी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पंचायत समिती स्तरावरून माहिती व्यवस्थित अचूक येत नसल्यामुळे पदोन्नती प्रकियेत नानाविध प्रकारच्या तांत्रिक समस्या येत आहेत. त्या करिता पंचायत समिती स्तरावरून सेवा जेष्ठता यादी अचूक योग्य माहिती सादर केल्यास पदोन्नती प्रकियेत अडथळे येणार नाहीत. त्यासाठी सेवाजेष्ठता यादीसाठी माहिती सादर करताना संबंधिताची मूळ सेवापुस्तिकेतील नोंदी पाहुनच माहिती नोंदवण्यात यावी.
- जिल्हयातील ब-याच कर्मचा-याना त्यांनी जिल्हा परीषद सेवेत रूजू होण्यापुर्वी खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित / विनानुदानीत शाळेत केलेली सेवा जोडून मान्यता प्रदान केलली आहे. सदरची सेवा केवळ सेवा निवृती वेतनासाठी लाभ कारक असताना काही शिक्षकांनी सदर सेवाजोड दिनांक सेवाजेष्ठता दिनांकासाठी वापरलेला आहे. सदर बाब अत्यंत गंभीर आहे. केवळ नांदेड जिल्हा परीषदेत शिक्षक पदावर रूजू झालेला दिनांक हा त्यांचा सेवा जेष्ठता दिनांक गृहित धरण्यात यावा अन्य सेवेव्दारे मान्य करण्यात आलेल्या सेवा सेवाजेष्ठतेसाठी ग्राहय धरण्यात येवू नयेत.
- जिल्हयातील बहुतांश शिक्षकांना तांत्रिक कारणास्तव सेवाखंड क्षमापन मान्य करण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परीषदेत कार्यरत असताना सेवाखंड देवून पुनश्च सेवा देण्यात आली आहे. अशा शिक्षकांचे मा विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी सेवा खंड मंजूर केले आहेत, अशा शिक्षकांची सेवा सेवाजेष्ठता यादी साठी सदर सेवाजेष्ठता दिनांक म्हणून गृहीत धरण्यास हरकत नाही.
- आंतर जिल्हा बदलीने (एकतर्फी) नांदेड जिल्हा परीषदेत रूजू झालेल्या शिक्षकांना या जि. प. त रूजू झालेला दिनांक सेवा जेष्ठतेसाठी ग्राहय धरण्यात यावा. मात्र ज्या शिक्षकांची परस्पर (आपसी) आंतर जिल्हा बदलीने नियुक्ती झालेली आहे. अशा शिक्षकांना महाराष्ट्र जिल्हा परीषदा जिल्हा सेवा प्रवेश नियम १९६७ मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-याने जो सेवाजेष्ठता दिनांक मान्य केला आहे तो गृहीत धरण्यात यावा.
- तालुका स्तरावर सेवाजेष्ठतेसाठी तयार करण्यात आललेी माहिती वा या कार्यालयाने सादर केलेली माहिती संबंधित कर्मचारी यांचे नजरेस ती आणून देवून बरोबर असल्याची खात्री करावी. व त्याचे नावासमोरील रकान्यात सदर माहिती अचूक व **बरोबर असले बाबत संबंधिताची स्वाक्षरी घेण्यात यावी .**
- सेवाजेष्ठता यादी स्वतंत्र माध्यम निहाय तयार करण्यात आली आहे.
- प्राथमिक शिक्षक / पदवीधर शिक्षक / उच्चश्रेणी मुख्याध्यापक / या संवर्गातील पदवी अर्हता प्राप्त शिक्षकांना भविष्यात पदोन्नती साठी त्यांचे घोषीत विषय असणे आवश्यक आहे. घोषणापत्र मूळ सेवा पुस्तिकेत नोंदवलेले असणे गरजेचे आहे. त्यानुसार सेवाजेष्ठता यादीत विषयाची नोंद घेण्यात यावी.
- माध्यमिक शिक्षक या संवर्गात या कार्यालयाने घोषीत केलेल्या विषयानुसार विषयाची नोंद घेण्यात यावी.

- प्राथमिक/पदवीधर संवर्गातील शिक्षक यांचे घोषीत विषयाची नोंद त्यांच्या पदवीच्या शालेय विषया वरून करण्यात यावी.
- पदवी चे विषय व बी एड च्या अध्यापन पध्दती यांची मूळ गुण पत्रिकेवरून नोंद घेण्यात यावी. ज्या शिक्षकांची पदवी अर्हता व बी एड अर्हता शासन मान्य विद्यापीठाची आहे. अशाचीच नोंद घेण्यात यावी. शिक्षक ज्या माध्यमाचा असेल त्या माध्यमाचीच अर्हता असणे गरजेचे आहे. अन्यथा तशी नोंद घेण्यात येवू नये.
- सदर सेवाजेष्ठता यादी-२०२३ जिल्हा परीषदेच्या संकेतस्थळावर www.zpnanded.in वर प्रसिध्द करण्यात येत आहे.
- सेवाजेष्ठता यादी बाबत खालील नियोजन करण्यात येत आहे.
  १. सेवाजेष्ठता यादी शाळा स्तरावर देवून प्रत्येक शिक्षकांनी माहिती ची खातरजमा करून स्वाक्षरी करणे (केंद्रप्रमुखांनी शाळा स्तरावर कॅम्प आयोजन करावे) केंद्र स्तरावर सर्व शिक्षकांना बोलावून घेवून माहिती अचूक व सत्य असल्याबाबत नोंद घेणे / आक्षेप घेणे पुराव्यासह पत्र घेणे दिनांक –१६.०१.२०२३ ते १९.०१.२०२३
  २. तालुका स्तरावर आक्षेप व हरकती यांची यादी करणे व योग्य आक्षेप मान्य करून ते सेवाजेष्ठता यादीत दूरूस्त करणे –दुरुस्ती यादी देणे.- नविन नावे समाविष्ट केलेल्या शिक्षकांची यादी- नावे कमी केलेलल्या शिक्षकांची यादी-दिनांक -२०.०१.२०२३ ते २२.०१.२०२३
  ३. गटशिक्षणाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर आक्षेप हरकती यादी पुराव्या सह सादर करणे, मान्य आक्षेप दुरुस्ती यादी, व दुरुस्ती सह अंतीम सेवा जेष्ठता यादी सादर करणे दिनांक—२३.०१.२०२३.(सॉफट कॉपी व हार्ड कॉपी सह शेख युनुस यांचेकडे देणे)-
  ४. जिल्हा स्तरावर सर्व अंतीम सेवाजेष्ठता यादी यांचे संकलन , आक्षेप व हरकती असलेल्या ची यादी, सेवाजेष्ठता यादीत दुरुस्ती केलेल्यांचा यादी व तपशील ,नविन नावे समाविष्ट यादी, नावे कमी केलेल्यांची यादी, दिनांक २४.०१.२०२३ ते २७.०१.२०२३
  ५. अंतीम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करणे ३०.०१.२०२३
  ६. तालुक्याचा सर्व संवर्गाचा मान्य कार्यरत रिक्त पदाचा दिनांक ३१.०१.२०२३ चा तपशील सादर करणे .

| अ.क्रं | संवर्ग | मान्यपदे | कार्यरतपदे | रिक्तपदे | अतिरीक्त पदे | रिक्त ठिकाणची नावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शिक्षक-मराठी | | | | | |
| २ | पदवीधर-मराठी-भाषा | | | | | |
| ३ | पदवीधर-मराठी-सा.शा | | | | | |
| ४ | पदवीधर-मराठी-ग/वि | | | | | |
| ५ | प्राथमिक शिक्षक-उर्दू | | | | | |
| ६ | पदवीधर-उर्दू-भाषा | | | | | |
| ७ | पदवीधर-उर्दू-सा.शा | | | | | |
| ८ | पदवीधर-उर्दू-ग/वि | | | | | |
| ९ | उच्चश्रेणी मु.अ-मराठी | | | | | |
| १० | उच्चश्रेणी मु.अ-उर्दू | | | | | |
| ११ | केंद्रप्रमुख | | | | | |
| १२ | अराजपत्रित मुख्याध्यापक | | | | | लागू नाही |
| १३ | माध्यमिक शिक्षक-मराठी | | | | | लागू नाही |
| १४ | माध्यमिक शिक्षक-उर्दू | | | | | लागू नाही |
| १५ | शारीरीक शिक्षक | | | | | लागू नाही |
| १६ | चित्रकला शिक्षक | | | | | लागू नाही |
| १७ | प्रयोगशाळा सहायक | | | | | लागू नाही |
| १८ | विस्तार अधि-शिक्षण | | | | | |
| १९ | दिव्याग सेवाजेष्ठता | | | | | लागू नाही |

(डॉ .सविता बिरगे)
शिक्षणाधिकारी प्रा.
जिल्हा परीषद नांदेड.

प्रतिलीपी,
१.मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , जि.प. नांदेड माहितीस्तव सविनय सादर.

(डॉ .सविता बिरगे)
शिक्षणाधिकारी प्रा
जिल्हा परीषद नांदेड.